MHGA040005842025

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : १५.०९.२०२५ |
| नोंदणी तारीख | : १५.०९.२०२५ |
| निकाल तारीख | : ०७.०५.२०२६ |
| कालावधी | : ००वर्ष, ०७म.,२२दि. |

**नि.क्र.९** वर

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०७/०५/२०२५)**<br>**सं.फौ.मा.क्र.३७८/२०२५** |
| | गुन्हा क्र. :११०/२०२५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **आरोपी** | **नाजुक लहानु मेश्राम,**<br>वय ५६ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. अरसोडा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपीचे विधिज्ञ श्री दरेकर |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २१.०३.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | २१.०३.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | १५.०९.२०२५ |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | ०५.०१.२०२६ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २७.०३.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०७.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## आरोपीचा तपशिल

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु. सं. च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाजुक लहानु मेश्राम | कलम ३५(३) भा.ना.सु. सं. सुचनापत्र दिले. | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | काही नाही |

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | अतुल गोपाल भोयर | ९ वर | पंच |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. फिर्यादी :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब. बचाव :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.२ | सि.ए. अहवाल |

**ड. भौतीक वस्तु :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्या य नि र्ण य

**(दिनांक ०७ मे, २०२६ रोजी घोषित)**

आरोपी हा मौजा अरसोडा, ता. आरमोरी येथे त्याच्या राहत्या घराच्या पहिल्या खोलीत प्रवेश दारा मागे एका थैलीत रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारुच्या ९०

मि.ली. मापाच्या २८ नग सिलबंद बॉटल अवैध्यरित्या विनापास परवाना विक्रीकामी मिळुन आल्याने आरोपीवर कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करुन खटला चालविण्यात आला. त्यानंतर अभियोग पक्षाने पंच साक्षीदार तपासला. खालील मुद्दे माझे समोर उपस्थीत झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले आहे कायं दि.२१.०३.२०२५ रोजी १९.०० ते १९.३० वाजताचे दरम्यान मौजा अरसोडा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या राहत्या घराच्या पहिल्या खोलीत प्रवेश दारा मागे एका थैलीत रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारुच्या ९० मि.ली. मापाच्या २८ नग सिलबंद बॉटल अवैद्यरित्या विनापास परवाना विक्रीकामी मिळुन आल्या, त्याद्वारे आरोपीने कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा
## मुद्दा क्र.१ व २ :-

२. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदारांची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने पंच अतुल भोयर (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, दि.२१.०३.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला पंचनामा करण्याकामी गावातील चौकात बोलाविले आणि सुचनापत्र दिले. त्यानंतर तो पोलीसांसोबत आरोपीच्या घरी गेला. आरोपीच्या घराची झडती घेतली असता घरात देशीचे टिलु आढळुन आले. त्यानंतर सदर टिलु पोलीसांनी जप्त केले आणि त्यानंतर पोलीसांनी पंचनामे (नि.क्र.११ व १२) तयार करुन त्यावर त्याची सही घेतली.

३. आरोपीच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात नकाराशिवाय काहीही आले नाही.

४. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता पंच साक्षीदाराने त्याला पोलीसांनी सुचनापत्र दिले असे सांगितले आहे. परंतु सुचनापत्राला सिद्ध का करण्यात

आले नाही. तसेच आरोपीच्या ताब्यातुन किती दारु पकडली हे सांगितले नाही. सि.ए. करीता दारु वेगळी काढली किंवा नाही हे सुध्दा सांगितले नाही. त्यामुळे पंच साक्षीदाराचा पुरावा हा अभियोग पक्षाच्या कथनाला बळकटी देणारा नाही. तसेच अभियोग पक्षाने त्याचे पुराव्याला सुसंगत असा कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. तसेच अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून देखिल इतर साक्षीदारांना हजर करु शकलेले नाही. फिर्यादी व तपासी अंमलदार यांना वारंवार समन्स काढून देखिल ते साक्ष देण्याकरीता न्यायालया समक्ष हजर झाले नाहीत. अभियोग पक्षाने सि.ए. अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे परंतु नमुना वाहकाला न तपासल्याने आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेले द्रव्य ही दारुच होती ही बाब सप्रमाण सिध्द होऊ शकलेली नाही. करीता जप्त दारुशी आरोपीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध होता असे कुठेही दिसून येत नाही. सदर दारु आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली व सदर दारुवर आरोपीचा ताबा होता हे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे आरोपीने गुन्हा केला हे सिद्ध होत नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर ‘नकारार्थी’ देत आहे व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **नाजुक लहानु मेश्राम** याची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता संहितेच्या कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त रॉकेट संत्रा कंपनीच्या देशी दारुच्या ९० मि.ली. मापाच्या २८ नग सिलबंद बॉटल अपिल कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, गडचिरोली येथे योग्य त्या विल्हेवाटी करीता पाठविण्यात याव्या.

३. आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात आले आहे.

४. आरोपीने रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र कलम ४८१(१) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये दाखल करावे. सदर बंधपत्र पुढील ०६ महिन्यांसाठी अस्तीत्वात राहिल.

(आदेश खुल्या न्यायालयात तोंडी सांगण्यात आला व उद्घोषित करण्यात आला.)

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.07 17:29:36 +0530

दिनांकः०७.०५.२०२६

(श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
आरमोरी.